MHPU260000212016

क्रि.एम.ए. नं.१०/२०१६
ज्योति खेडेकर
विरुद्ध
तुषार खेडेकर व इतर

निशाणी १२० वरील आदेश

जाबदेणार क्र. १ यांनी प्रस्तुतचा अर्ज दि. ०३/०७/२०२५ रोजी नि.क्र. १०४ वरील पारीत आदेशामध्ये बदल करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. जाबदेणार क्र. १ यांच्या म्हणण्यानुसार नि.क्र. १०४ खालील पारीत करण्यात आलेल्या आदेशामध्ये अर्जदार व त्यांच्या मुलीला सर्वे नं. ५३/२७, फलॅट नं. २, हेवन प्राईड, एसआरपी गेट नं. २ जवळ, विकास नगर, वानवडी, पुणे या घरामध्ये पुढील आदेशापर्यंत राहण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु सदरची मिळकत ही जाबदेणार क्र. १ यांची नसून त्यांच्या भावाच्या मालकीची आहे. त्याचप्रमाणे सध्या ती भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीमध्ये अर्जदार व त्यांच्या मुलीला राहण्याचे हक्क व अधिकार नाहीत. जाबदेणार क्र. १ यांनी बिटी कवडे रोड येथे भाडयाने घर घेतलेले आहे. सबब दि. ०३/०७/२०२५ रोजी नि.क्र. १०४ वरील पारीत केलेल्या आदेशामध्ये बदल करण्यात यावे व अर्जदार यांना जाबदेणार क्र. १ यांनी बिटी कवडे रोड वानवडी, पुणे येथे भाडयाने घेतलेल्या घरामध्ये राहण्याबाबत आदेशीत करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास अर्जदार यांनी नि.क्र. १२७ वर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सर्वे नं. ५३/२७, फलॅट नं. २, हेवन प्राईड, एसआरपी गेट नं. २ जवळ, विकास नगर, वानवडी, पुणे ही मिळकत मयत कुंदाबाई खेडेकर यांनी खरेदी घेतलेली आहे. त्यामुळे सदरची मिळकत जाबदेणार क्र. २ यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीत होती. जाबदेणार क्र. २ या दि. ०३/१०/२०१६ रोजी

मयत झालेल्या आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर जाबदेणार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे सदरची मिळकत ही जाबदेणार क्र. १ यांच्याही मालकीची आहे. परंतु जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार यांचे हक्क डावलण्याच्या कारणासाठी सदरची मिळकत जाबदेणार क्र. ३ यांना बक्षीस पत्राद्वारे दिलेली आहे. अर्जदार व जाबदेणार हे जुन २०२५ पर्यंत सदर मिळकतीमध्येच राहण्यास होते. अर्जदार यांना सदर मिळकतीमध्ये राहण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. सबब जाबदेणार क्र. १ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

**४.** संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षातर्फे विव्दान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणात दि. ०३/०७/२०२५ रोजी नि.क्र. १०४ वर आदेश पारीत करुन सर्वे नं. ५३/२७, फलॅट नं. २, हेवन प्राईड, एसआरपी गेट नं. २ जवळ, विकास नगर, वानवडी, पुणे या घरामध्ये अर्जदार व त्यांच्या मुलीला पुढील आदेशापर्यंत राहण्याची परवानगी देण्यात आलेली होती. परंतु जाबदेणार क्र. १ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सदर आदेशामध्ये बदल करण्याची विनंती केलेली आहे. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायद्यातील कलम २५ अन्वये सदर कायद्यातील तरतुदी अन्वये एखादा आदेश पारीत केला असल्यास सबळ कारणानिशी त्या आदेशामध्ये न्यायालयाला बदल किंवा रदद करता येईल. प्रस्तुत प्रकरणात नि.क्र. १०४ वरील आदेश पारीत करतेवेळी वर नमुद मिळकतीच्या मालकी संबंधीचे कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर दाखल नव्हते. परंतु सध्या जाबदेणार क्र. १ यांच्या तर्फे सदरची कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्यात आलेली आहेत. सबब कायद्यातील वर नमुद तरतुदीनुसार परिस्थितीत बदल झाल्यामुळे सदर न्यायालयास प्रस्तुतचा अर्ज विचारात घेता येईल.

**५.** जाबदेणार क्र. १ यांच्या तर्फे दाखल कागदपत्रावरुन असे दिसून येते की, सर्वे नं. ५३/२७, फलॅट नं. २, हेवन प्राईड, एसआरपी गेट नं. २ जवळ, विकास नगर, वानवडी, पुणे ही मिळकत जाबदेणार क्र. १ यांनी जाबदेणार क्र. ३ यांना बक्षीस

पत्रान्वये सन २०१९ मध्ये दिलेली आहे. तसेच सदरचे घर सध्या भाडेतत्वार दिल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात दाखल तडजोड पुरसिस नुसार अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांची पुर्वी तडजोड झालेली होती व त्यामुळे सामंजस्याने त्या सदर घरामध्ये राहत असल्याचे दिसून येते. सदरचे घर मिळकत ही महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायद्यातील तरतुदी नुसार shared household या व्याखेमध्ये येते किंवा कसे याबाबत पुराव्याअंती शाबीत होणार आहे. सध्या जाबदेणार क्र. १ हे अर्जदार व त्यांच्या मुलीला भाडेतत्वावर घर घेवून देण्यास तयार आहेत. सदर बाबींचा विचार करता सध्या अर्जदार व त्यांच्या मुलीला सर्वे नं. ५३/२७, फलॅट नं. २, हेवन प्राईड, एसआरपी गेट नं. २ जवळ, विकास नगर, वानवडी, पुणे या घरामध्ये राहण्यास परवानगी देणे न्यायोचित वाटत नाही. परंतु अर्जदार व त्यांच्या मुलीची राहण्याची तात्पुर्ती सोय म्हणून ५२/२/१, फलॅट नं. २, कला शंकर नगर, बीटी कवडे रोड, घोरपडी व्हीलेज, वानवडी, पुणे या जाबदेणार क्र. १ यांनी भाडेतत्वावर घेतलेल्या घरामध्ये राहण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. त्यामुळे दि. ०३/०७/२०२५ रोजी नि.क्र. १०४ वरील पारीत केलेल्या आदेशामध्ये बदल करणे न्यायोचित वाटते. त्याचप्रमाणे अर्जदार व त्यांच्या मुलीला जाबदेणार क्र. १ यांनी भाडयाने घेतलेल्या घरामध्ये राहता यावे म्हणून जाबदेणार क्र. १ यांना सदर घराचे डिपॉझीटची रक्कम व पुढील एक वर्षाचे दरमहाचे होणारे भाडे रक्कम न्यायालयात भरण्यास सांगने न्यायोचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज (नि. १२०) मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार व त्यांच्या मुलीला ५२/२/१, फलॅट नं. २, कला शंकर नगर, बीटी कवडे रोड, घोरपडी व्हीलेज, वानवडी, पुणे या घरामध्ये राहण्याची पुढील आदेशापर्यंत परवानगी देण्यात येत आहे.

३. जाबदेणार क्र. १ यांना आदेशीत करण्यात येत आहे की, त्यांनी ५२/२/१, फलॅट नं. २, कला शंकर नगर, बीटी कवडे रोड, घोरपडी व्हीलेज, वानवडी, पुणे या घरासाठी लागणारे डिपॉझीट रक्कम व

दरमहाचे एक वर्षाचे भाडे रक्कम न्यायालयात जमा करण्याचे आहेत.

४. जाबदेणार क्र. १ यांना आदेशीत करण्यात येते की, सदर घराचे डिपॉझीट रक्कम व दरमहाचे ६ महिन्याचे भाडे रक्कम आदेश पारीत तारखेपासून १५ दिवसांच्या आत न्यायालयात भरण्याचे आहे.

५. जाबदेणार क्र. १ यांना आदेशीत करण्यात येते की, सदर घराचे पुढील दरमहाचे ६ महिन्याचे भाडे रक्कम आदेश पारीत तारखेपासून दोन महिन्यांचे आत न्यायालयात भरण्याचे आहे.

६. सदर डिपॉझीट रक्कम व भाडे रक्कम अर्जदार यांना न्यायालयातून काढून घेण्याची मुभा देण्यात येत आहे.

७. सदर आदेशाची प्रत अर्जदार व जाबदेणार यांना विनामुल्य देण्याची आहे.

सही/-

(श्रीमती एस. ए. माळी)

५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

वडगाव, ता. मावळ, जि. पुणे

दि.०२.०९.२०२५

वडगाव मावळ